!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# मराठवाड्याचा सिंचन अनुशेष भरुन काढा
# : खासदार चंद्रकांत खैरे यांची बैठकित मागणी

**अर्धवट १८ हजार कोटीच्या प्रकल्पांना पूर्ण करण्याची मंत्रीमंडळ बैठकित मागणी करणार**

**संभाजीनगर ( ता.१९ ) :** सततच्या दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक वर्षापासुन मराठवाडा भागाचा अनुशेष भरला नाही, मोठे लघू व मध्यम प्रकल्पाची अर्धवट कामे, प्रकल्पग्रत गावांची पुनवर्सनाची समस्या, यासारख्या प्रश्नांना प्राधान्याने पूर्ण करावे, अशा विविध मागण्या करत संभाजीनगर येथे होणाऱ्या मंत्रीमंडळात बैठकित आवाज उठवू, तसेच मराठवाड्याचा ६६० कोटीचा अनुशेष, १८ हजार कोटीची अर्धवट कामे पूर्ण करण्यासाठी जलसंपदामंत्री गिरीष महाजन, राज्यमंत्री विजय शिवतारे, मुख्य सचिव यांची भेट घेऊन पूर्ण करण्याची मागणी करणार असल्याचे खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकित सांगितले आहे.

मराठवाड्यातील भिषण दुष्काळाचा आढावा, मोठे, मध्यम व लघू प्रकल्पाची कामे, याबाबत गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांच्या सभागृहात झालेल्या आढावा बैठकिला आमदार संदिपान भुमरे, शिवाजी बनकर पाटील, कार्यकारी संचालक च. आ. बिराजदार, आर. के. मिटूरकर, सी. एल. हंगेकर, एन. व्ही. शिंदे, एस. टी. भार्गेदेव, पी. भी. शेलार यांची बैठकिस उपस्थित होती.

**प्रसिध्दी प्रमुख**
गणेश वाघ.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५
cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com
8421415255/9420404329 8484066606/9604384400